**संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ**
**(नॅकद्वारा 'अ' मानांकन प्राप्त)**

**जनसंपर्क विभाग**

---

**२०१९-२० मधील विद्यापीठ उत्कृष्ट कलावंत, प्राविण्य प्राप्त स्पर्धक, साथीदार व चमू व्यवस्थापकांचा १ मे रोजी विद्यापीठातर्फे सत्कार**

अमरावती-

सत्र २०१९-२० मधील निवड करण्यात आलेल्या उत्कृष्ट कलावंत मुले व मुली, राष्ट्रीय कव्वाली, मध्य विभाग व अखिल भारतीय आंतर विद्यापीठ स्पर्धेत प्राविण्य प्राप्त चमूतील स्पर्धक, कलावंत, साथीदार व चमू व्यवस्थापक यांचा कुलगुरू डॉ. मुरलीधर चांदेकर यांचे हस्ते सत्कार होणार असून गौरव करण्याकरीता सत्कार समारंभाचे आयोजन विद्यार्थी विकास विभागाद्वारे दि. १ मे, २०२१ रोजी आभासी पद्धतीने करण्यात आले आहे.

मध्य विभाग व अखिल भारतीय आंतर विद्यापीठ स्तरावर विद्यापीठाच्या स्पर्धकांनी नेत्रदीपक कामगिरी करुन विद्यापीठाच्या नावलौकिकात भर घातली आहे. या स्पर्धांमध्ये त्यांनी पदके प्राप्त केली असून ही विद्यापीठासाठी गौरवाची बाब आहे. सत्कार करावयाच्या सर्व स्पर्धक, कलावंत मुले, मुली, साथीदार व चमू व्यवस्थापकांची यादी सर्व संबंधित महाविद्यालयांचे प्राचार्य, पदव्युत्तर शैक्षणिक विभागप्रमुख यांना विद्यार्थी विकास विभागाने पाठविली आहे.

सदर सत्कार समारंभ झुम ॲप व युट्युब लिंक https://youtu.be/CfCz_ZC2s8g यावरुन थेट प्रक्षेपण करण्यात येणार आहे. तरी सर्व संबंधितांनी सत्कार समारंभाला आभासी पद्धतीने उपस्थित राहण्याचे आवाहन विद्यापीठाच्यावतीने विद्यार्थी विकास विभागाचे संचालक डॉ. दिनेशकुमार सातंगे व कुलसचिव डॉ. तुषार देशमुख यांनी कळविले आहे.

---

प्रति,　　　　　　　　　　　　　　　　　　　　**जनसंपर्क विभाग**
मा. संपादक/जिल्हा प्रतिनिधी　　　　　　　　　　　　दि. २०/०८/२०१८.
दै.............................. अमरावती.

मा. महोदय,

आपणांस विनंती करण्यात येते की, सोबतच्या वृत्तास आपल्या लोकप्रिय वृत्तपत्रातून कृपया प्रसिद्धी द्यावी, ही विनंती.

आपला,

**(डॉ. विलास नांदुरकर)**
जनसंपर्क अधिकारी